सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

जाहीर ई- निविदा सुचना (२०१९-२०२०)
क्र.सामान्य/कक्ष-०४/टे-०२/पा.टं./२०१९
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दि.३० /०१/२०१९

ठाणे जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाययोजने अंतर्गत गावे, वाड्या, पाडे क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार बंद टँकरने पिण्याचे पाणी पुरवठा करावयाचा आहे. सदर कामासाठी इच्छुक खाजगी टँकर ई- निविदाधारकांकडून करारनामा केल्याच्या दिनांकापासून १ वर्ष कालावधीकरिता ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | ठाणे जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागातील गावांमध्ये आवश्यकतेनुसार खाजगी टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन निविदा व फॉर्मची किंमत | रु.२०,०००/- (अक्षरी -वीस हजार रूपये मात्र) प्रति निविदा रक्कम ऑनलाईन पध्दतीने एस.बी.आय. इंटरनेट बँकिंग किंवा एन.ई. एफ.टी. व्दारे स्विकारण्यात येईल. |
| २ | अनामत रक्कम (बयाना रक्कम) | अनामत रक्कम ६,००,०००/- (अक्षरी- सहा लाख रूपये मात्र) ऑनलाईन पध्दतीने एस.बी.आय. इंटरनेट बँकींग किंवा एन.ई.एफ.टी. व्दारे स्विकारण्यात येईल. |
| ३ | सुरक्षा ठेव रक्कम | रू १०,००००० /- (अक्षरी- दहा लाख रूपये मात्र) सुरक्षा ठेव म्हणून राष्ट्रीकृत बँकची गॅरंटी (हमीपत्र) एफ.डी. |
| ५ | संपर्क अधिकारी | श्री. जलसिंग वळवी, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) ठाणे |
| ६ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक- ३१/०१/२०१९ सकाळी १०.०० वा. |
| ७ | ई- निविदा विक्री व डाऊनलोड करण्याचा दिनांक | दिनांक-३१/०१/२०१९ सकाळी १०.०० ते दि.१२/०२/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ८ | प्रि- बिड मिटिंग दिनांक व वेळ | दि.०२/०२/२०१९ रोजी सकाळी/ दुपारी १२.०० वा.<br>उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांचे दालनात |
| ९ | ई-निविदा ऑनलाईन भरण्याचा अंतिम दिनांक | दि. १२ /०२/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| १० | ई-निविदा लिफाफा क्र. ०१ व ०२ उघडण्याचा संभाव्य दिनांक व स्थळ | दिनांक-१४/०२/२०१९ रोजी दुपारी १२.००वा.<br>जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे |

उक्त कामाबाबत निविदा अटी व शर्ती इत्यादीबाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केला असून http: mahatenders.gov.in व www.thane.nic.com या संकेत स्थळावर दिनांक- ३१/०१/२०१९ ते दिनांक-१२ /०२/२०१९ पर्यंत उपलब्ध राहतील. तसेच ई- निविदा दि. १४/०२/२०१९ रोजी दुपारी १२.००वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे उघडण्यात येतील.

दिनांक :-३० /०१/२०१९
स्थळ :-ठाणे

जिल्हाधिकारी ठाणे

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे - ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ - २५३४ ३६३६ / २५३४ १७३७ / ३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in

निविदाधारकांने ई- निविदा सादर करतांना व्दिबंद लिफाफा पध्दतीने सादर करावयाचा आहे. त्यापैकी लिफाफा क्रमांक-१ तांत्रिक बाबीचा असून त्यात मागविण्यात आलेल्या कागद पत्रांची पुर्तता करणाऱ्या निविदा धारकांचा लिफाफा क्रमांक-२ दराबाबतचा लिफाफा उघडण्यात येईल.

**लिफाफा क्रमांक -१ मधील तांत्रिक बाबींची पुर्तता न करणाऱ्या निविदाधारकांचा, लिफाफा क्र. -२ उघडण्यात येणार नाही.**

| १ | **( तांत्रिक) लिफाफा क्रमांक-१ मध्ये आवश्यक तपशील** |
|---|---|
| १ | ऑनलाईन निविदा फॉर्मची किंमत रूपये २०,०००/- (अक्षरी- वीस हजार रूपये मात्र ) प्रती निविदा रक्कम ऑनलाईन पध्दतीने एस.बी.आय. इंटरनेट बँकींग किंवा एन.ई एफ.टी. व्दारे स्विकारण्यात येईल. |
| २ | अनामत(बयाना) रक्कम रूपये ६,००,०००/-(अक्षरी- सहा लाख रूपये मात्र) ऑनलाईन पध्दतीने एस.बी.आय. इंटरनेट बँकींग किंवा एन.ई.एफ.टी. व्दारे स्विकारण्यात येईल. |
| ३ | १.निविदाधारकाने ७.५ मे.टन, १२ मे. टन, २४ मे. टन क्षमतेचे स्वत:चे मालकीचे कमीत कमी ५ टँकरची माहिती (आर.सी. बुक साक्षांकित छायाप्रतिसह) निविदेसोबत देणे आवश्यक आहे व टँकर इतरांच्या मालकीचे असल्यास टँकर मालकाचे टँकर पुरविण्याबाबतचे हमीपत्र एकूण ५ टँकरचे निविदेसोबत स्कॅन करून कॉपी सोबत जोडावी.<br>२)आर.टी.ओ. नोंदणी प्रमाणपत्र<br>३) प्रत्येक टँकरची व्यापक विमा पॉलीसी अस्तित्वात असावी.<br>४)अद्यावत वाहनकर व वाहनाचा विमा भरल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा पावती.<br>५)टँकर सुस्थितीत असल्याचे आर.टी.ओ. चे प्रमाणपत्र (fitness certificate) ची स्कॅन कॉपी अपलोड करावी तसेच हे टँकर नंबर्स इतर जिल्ह्यास दिलेले नसावेत.<br>६)निविदाधारकाने किमान २५ खाजगी टँकर उपलब्ध करून देण्यास तयार असल्याबाबत रू. १००/- चे बॉन्ड पेपर वर तालुका दंडाधिकारी यांचे समोर केलेले हमीपत्र देणे बंधनकारक राहील. |
| ४ | पिण्याचे पाणी पुरवठा केल्याबाबत जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील ३ वर्षाचे अनुभवाचे प्रमाणपत्र ( शासकीय कामाचे) स्कॅन कॉपी अपलोड करावे. |
| ५ | आयकर भरल्याचे मागील ३ वर्षाचे अद्यावत रिटर्नस/ भागीदारी संस्थेच्या बाबतीत प्रत्येक भागीदाराने आयकर भरल्याबाबतचे रिर्टन स्कॅन कॉपी अपलोड करावी. |
| ६ | निविदाधारक संस्था असल्यास संस्थेच्या बाबतीत नोंदणी पत्र तसेच भागीदारी फार्मच्या बाबतीत नोंदणीकृत भागीदारी पत्रक स्कॅन कॉपी अपलोड करावी. |
| ७ | व्यवसाय कर भरल्याची पावती व पॅन कार्ड स्कॅन कॉपी अपलोड करावी. |
| ८ | ई- निविदा, फॉर्म अटी व शर्तीसह मान्य असल्याबाबत शपथपत्राची तसेच ई- निविदाधारकाविरूध्द गैरव्यवहार/ काळया यादीत समाविष्ट नसल्याबाबतची स्वत:चे रूपये १००/- च्या बॉड पेपरवर शपथपत्र स्कॅन कॉपी अपलोड करावी. |
| ९ | सदर लिफाफ्यात निविदा धारकाचे नाव/ संस्थेचे नाव, संपर्काचा संपुर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ई- मेल आयडी सह निविदाधारक वैयक्तिक असल्यास त्याचा स्वत:चा आधार कार्ड क्रमांक व निविदाधारक |

| | |
|---|---|
| | संस्था असल्यास प्रवर्तकाचे आधारकार्ड क्रमांक नमुद करावा. |

| **२** | **लिफाफा क्र. ०२ मध्ये आवश्यक तपशील** |
|---|---|
| १ | लिफाफा क्रमांक-२ या लिफाफामध्ये ई- निविदा फॉर्ममध्ये विहीत केलेल्या (BOQ File) मध्येच प्रपत्रात दर पुर्ण भरून स्कॅन कॉपी अपलोड करावी. |

**जिल्हाधिकारी ठाणे**

ठाणे जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणार्थ राबवण्याच्या उपायोजने अंतर्गत गांवे, वाड्या, पाडे क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार बंद टँकरने पिण्याचे पाणी पुरवठा करावयाचा आहे. सदर कामासाठी इच्छुक खाजगी टँकर ई- निविदाधारकांकडून करारनामा केल्याच्या दिनांकापासून १ वर्ष कालावधीकरिता निविदा धारकांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहे.

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

**(पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरबाबत शासनाचे सुधारित दर व अटी शर्ती खालील नमुद शासननिर्णय प्रमाणे राहतील.)**

( पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय, मुंबई यांचे शा.नि.क्र./ टंचाई २०१८/ प्र.क्र. १६७/ पापु-१४, दि. १९/१२/२०१८.)

| प्रति मे. टन वाहन क्षमता | कमाल प्रतिदिन भाडे | कमाल प्रति किलोमीटर भाडे |
|---|---|---|
| १ मे. टन | २७० | ३.४० |

| टँकर / ट्रॅकवरील टाकींची पाणी वहन करण्याची क्षमता (दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये अतितीव्र घाट असलेल्या ठिकाणी | कमाल प्रतिदिन भाडे | कमाल प्रति किलोमीटर भाडे |
|---|---|---|
| ३००० ते ५००० लिटर्स | ३३८ | ४.३० |

| | |
|---|---|
| १ | कोणतीही ई- निविदा स्विकारणे अथवा सर्व ई- निविदा काहीही कारण न दाखवता रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी ठाणे यांनी राखून ठेवलेले आहे. |
| २ | ई- निविदेबाबत निविदाधारक मा. न्यायालयात गेल्यास त्याची कार्यकक्षा ही ठाणे जिल्हा न्यायालय असेल. |
| ३ | प्रस्तुत ई- निविदा सुचना तसेच ई- निविदा अटी व शर्तीबाबतची माहिती http ://mahatenders.gov.in व www.thane.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ४ | रुपये २०,०००/- (अक्षरी- वीस हजार रूपये मात्र) निविदा रक्कम ऑनलाईन पध्दतीने एस.बी.आय. इंटरनेट बँकिंग किंवा एन.ई.एफ.टी.व्दारे भरणा केल्यानंतर दिनांक ३१/०१/२०१९ वेळ सकाळी १०.०० वा.ते दि.१२/०२/२०१९ रोजी वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ई- निविदा ऑन-लाईन पध्दतीने मिळतील. ज्या कंत्राटदारांना काळया यादीत घोषित केले असेल किंवा त्याबाबत कार्यवाही सूरू असेल किंवा त्यांचेशी संलग्न असलेले कंत्राटदारांनी निविदा भरू नयेत. अशा कंत्राटदारांनी ई-निविदा भरल्यास किंवा पुढील कालावधीत त्यांची याबाबत सत्यता समोर आल्यास त्यांची निविदा रद्द करण्यात येईल. |
| ५ | जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे उपस्थित कंत्राटदार यांचे समक्ष ई- निविदा लिफाफा क्र. १ व २ दिनांक १४/०२/२०१९ रोजी सकाळी/ दुपारी १२.०० वाजता अथवा निम्न स्वाक्षरीतांचे सोयीनूसार ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील. ई- निविदा उघडण्याची तारीख व वेळ आवश्यक असल्यास |

| | |
|---|---|
| | बदलण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. |
| ६ | निविदा दोन संच लिफाफा पध्दतीने भरावी लागेल. |
| ७ | निविदाधारकाने स्वत:चे मालकीचे बंद ५ टँकरची माहिती द्यावी लागेल. टँकर इतरांचे मालकीचे असल्यास टँकर पुरवण्याचे हमीपत्र दाखल करणे आवश्यक आहे. त्याकरीता टँकरचे आर.टी.ओ. कडील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत तसेच प्रत्येक टँकरची व्यापक विमा पॉलीसी अस्तित्वात असावी व टँकर मालकाचे टँकर पुरविण्याबाबतचे १००/- (अक्षरी- शंभर रूपये मात्र) स्टँम्प पेपरवर असलेले हमीपत्र निविदेसोबत लिफाफा क्र. -१ मध्ये सादर करणे आवश्यक आहे. तसेच निविदाधारकाने किमान ५० खाजगी टँकर उपलब्ध करून देण्यास तयार असल्याबाबत रूपये १००/- चे बाँड पेपरवर तालुका दंडाधिकारी यांचे समोर केलेले हमी पत्र बंधनकारक राहील. |
| ८ | संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसिलदार सुचना देतील त्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील कोणत्याही गावांना वाड्यांना तसेच पाड्यांना सुध्दा टँकरने पाणी पुरवठा करावा लागेल. |
| ९ | टँकर्सना पाणी पुरवठा करण्यासाठी लागणारे इंधन/ वंगणाचा खर्च/ प्रथमत: संबंधित गटविकास अधिकारी करतील व टँकरच्या प्रत्येक बिलातून ही रक्कम कपात करण्यात येईल. तथापि टँकर दुरूस्तीचा खर्च ठेकेदार करतील व खाजगी ठेकेदार यांचे इंधन भरण्यासाठी जाणे/ येणेच्या प्रवासातील कि.मी. चे भाडे देय असणार नाही. सदरील उपाययोजनेची अंमलबजावणी तथा नियंत्रण गटविकास अधिकारी यांचेकडे राहील. शासनाकडून सदर योजनेसाठी निधी वेळेवर उपलब्ध न झाल्यास किंवा इतर काहीही कारणास्तव इंधन/ वंगण उपलब्ध झाले नसल्यास ठेकेदार कोणतीही तक्रार न करता अशा प्रसंगी इंधन/ वंगण उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी घेतील. |
| १० | मंजूर केलेल्या निविदा धारकांस करारनाम्याची मुदत संपल्यानंतर सुध्दा याच निविदा मंजूर दराने जिल्हाधिकारी ठाणे यांनी मुदतवाढ दिल्यास पाणी पुरवठा करावा लागेल. |
| ११ | ऑनलाईन निविदा फॉर्मची किंमत रूपये २०,०००/- (अक्षरी- वीस हजार रूपये मात्र) प्रती निविदा रक्कम व अनामत (बयाणा) रक्कम ६,००,०००/- (अक्षरी- सहा लाख रूपये मात्र) ऑनलाईन पध्दतीने एस.बी.आय. इंटरनेट बँकींग किंवा एन.ई.एफ.टी.व्दारे स्विकारण्यात येईल. |
| १२ | निविदा मंजूर झाल्यापासून ८ दिवसाचे आत रूपये १००/- ( अक्षरी- शंभर रूपये मात्र) स्टँपपेपरवर करारनामा करून देणे आवश्यक आहे. करारनामा करून न दिल्यास निविदा नामंजूर करण्यात येईल व अनामत रक्कम शासन जमा करण्यात येईल. |
| १३ | निविदेसोबत १ वर्षापेक्षा जास्त कालावधीची राष्ट्रीयकृत बँकेची गँरटी (हमीपत्र) रूपये १०,००,०००/- (सुरक्षा ठेव) (अक्षरी- दहा लाख रूपये मात्र) ची एफ.डी.आर. सादर करणे आवश्यक आहे. |
| १४ | निविदाधारकाने ७.५ मे. टन/ १२ मे टन/ २४ मे.टन क्षमतेचे स्वत:चे मालकीचे कमीत कमी ५ टँकरची माहिती ( आर.सी.बुक साक्षांकित छायाप्रतीसह) निविदेसोबत देणे आवश्यक आहे व टँकर इतरांच्या मालकीचे असल्यास टँकर मालकाचे टँकर पुरविण्यबाबतचे हमीपत्र एकूण ५ टँकरचे निविदेसोबत स्कॅन करून कॉपी सोबत जोडावी. तसेच आर.टी.ओ. नोंदणीप्रमाणपत्र, अद्यावत वाहनकर व वाहनाचा विमा भरल्याबाबतचे प्रमाणपत्र, टँकर सुस्थितीत असल्याचे आर.टी.ओ.चे प्रमाणपत्र सोबत जोडावे तसेच हे टँकर नंबर्स इतर जिल्ह्यास दिलेले नसावेत तसेच निविदाधारकांने किमान ५० खाजगी टँकर उपलब्ध करून देण्यास तयार असल्याबाबत रूपये १००/- चे स्टँप पेपरवर तालुका दंडाधिकारी यांचे समोर केलेले हमीपत्र बंधनकारक राहील. वाहन चालक व स्वेच्छाकांच्या |

| | |
|---|---|
| | वेतन भत्ते व राहण्याबाबतचा सर्व खर्च टँकर मालकांकडून देण्यात येईल याबाबत या कार्यालयाची काही जबाबदारी राहणार नाही. |
| १५ | टँकरने पाणी पुरवठा करतांना वाहनाचे लॉगबुक ठेवून त्यावर संबंधित गटविकास अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांची दररोज लॉगबुकवर स्वाक्षरी घ्यावी लागेल तसेच ज्या ठिकाणी पाणी पुरवठा केल्या जाईल. त्या ठिकाणच्या दोन महिलांच्या स्वाक्षऱ्या घेणे ठेकेदारास बंधनकारक आहे. त्यानुसार भाडे व बिल आकारण्यात येईल संबंधित गट विकास अधिकारी यांनी टँकरने देयक अदा करण्यापुर्वी संपुर्ण शहानिशा करून तपासून नंतरच देयक अदा करावे. |
| १६ | पिण्याचे पाणी पुरवठा केल्याबाबत मा. जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडील १ वर्षाचे अनुभवाचे प्रमाणपत्र (शासकीय कामाचे ) स्कॅन करून अपलोड करावी. |
| १७ | आयकर भरल्याचे मागील ३ वर्षाचे प्रमाणपत्र/ रिटर्न भागीदारी संस्थेच्या बाबतीत प्रत्येक भागीदाराने आयकर भरल्याबाबतचे प्रमाणपत्र / रिर्टन स्कॅन कॉपी अपलोड करावी. |
| १८ | ई- निविदाधारक भागीदारी संस्था/ वाहतूक कंपनी/ सहकारी संस्था असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राचे संस्थेच्या नियमावलीची (Bylaws) प्रत, रोख भांडवल, मागील दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व ई- निविदामध्ये भाग घेण्यासंबंधी/ संस्थेचा/ कंपनीचा ठराव स्कॅन कॉपी अपलोड करावी.तसेच निविदाधारक अथवा संस्था यांना वस्तु व सेवा कर (GST) अधिकृत नोंदणी क्रमांक असणे बंधनकारक आहे तसेच सदरील कर प्रणालीमध्ये शासनामार्फत वेळोवेळी करण्यात येणारे बदल लागू राहतील. |
| १९ | टँकरने पाणी पुरवठा केल्याबाबतचे काम असमाधानकारक आढळून आल्यास किंवा वेळेवर पाणी पुरवठा न केल्यास मंजूर निविदाधारकाचे टँकर्स बंद करण्यात येतील व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व दंड बँक गॅरंटी मधून वसूल करण्यात येईल. |
| २० | पाणी पुरवठा करण्याबाबत दिलेल्या आदेशानुसार पाणी पुरवठा तात्काळ सुरू करावा लागेल. |
| २१ | टँकर्स हे २४ तास सेवा या अटींवर घेण्यात येतील व २४ तास पाणी पुरवठा करावा लागेल व त्यानुसार प्रतिदिन भाडे आकारले जाईल. |
| २२ | पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरला आर.टी.ओ. ची मान्यता असणे आवश्क आहे व त्या टँकरवरील सर्व कर भरलेले असावे. तसेच पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमतेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडून किंवा ते प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यांकडून शहानिशा करूनच तपासून घ्यावी. त्यानुसार टँकरला देण्यात येणारे प्रतिदिन भाडे व प्रति किलोमीटर भाडे १ मे. टन एकका प्रमाणात देण्यात येईल. |
| २३ | निविदा मंजूर झाल्यानंतर जेवढे टँकर्स सुरू करणेविषयी आदेश दिले जातील तेवढेच टँकर आदेशात नमुद केलेल्या कालावधीसाठीच वापरले जातील तसेच लॉगबुकप्रमाणे भाडे दिले जाईल आणि आवश्यकतेनुसार टँकरने पाणी पुरवठा करणेबाबत सुचित करण्यात येईल व तो संबंधितांस बंधनकारक असेल. |
| २४ | टँकरने पाणी पुरवठा करतांना काही अपघात झाल्यास निविदाधारकांने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी. अपघाताची न्यायालयीन अथवा इतर कोणतीही जबाबदारी हे कार्यालय स्विकारणार नाही. |
| २५ | निविदाधारकांने त्याने दिलेल्या करारनाम्यातील कुठल्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास त्याची |

| | |
|---|---|
| | अनामत रक्कम तसेच त्याने जेवढे दिवस पाणी पुरवठा केला असेल त्या दिवसांचे भाडे जप्त करण्यात येईल व कंत्राटदारांचे नांव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल. |
| २६ | या कार्यालयाचे मागणी प्रमाणे पाणी पुरवठा करिता २४ तासांचे आत टँकर उपलब्ध न झाल्यास रूपये ३,०००/-( अक्षरी- तीन हजार रूपये मात्र) प्रतिदिन दंड आकारला जाईल व कंत्राटदाराचे नांव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल. |
| २७ | जिल्ह्यात पाणी पुरवठा करतांना वाहनास पडणारा टोल पथकर स्वत: (कंत्राटदारास/ ठेकेदारास) भरावा लागेल. |
| २८ | प्रथम शासकीय टँकर उपयोगात आणल्या जातील त्यानंतर पुढील पाणी टंचाई होण्याची शक्यता लक्षात घेता आवश्यकतेनुसार खाजगी टँकर उपयोगात आणल्या जातील. तसेच टँकर वरील भाडे तसेच टँकरचा इंधन व वंगनाचा खर्च हा शासनाकडून अनुदान उपलब्ध झाल्यानंतर देण्यात येईल. |
| २९ | आयकर अधिनियम १९६३ मधील अधिनियम १९४ सी व वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या तरतुदीनुसार टँकरने भाड्यापोटी देण्यात येणाऱ्या रक्कमेतून/ टि.डी.ए. यांची कपात द्यावी लागेल. |
| ३० | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक ६ मे २०१४ च्या शासन निर्णयानुसार पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली बसविल्यानंतर GPS प्रणालीवर ज्या टँकरच्या फेऱ्यांची नोंद होईल त्या फेऱ्या देयकाकरिता अनुज्ञेय होतील व ज्या पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली नसेल आणि टँकरवाहतूक धारकांनी टँकरच्या फेऱ्या झाल्याचा दावा केल्यास अशा फेऱ्या बनावट ठरतील. पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली बसविणे व त्याची देखभाल दुरूस्ती इत्यादी बाबतचा खर्च संबंधित टँकर वाहतूकदाराने करावा. |
| ३१ | चालू वर्षाकरीता टँकरने पाणी पुरवठ्याकरिता करारनामा केल्याच्या दिनांकापासून पुढील एक वर्षापर्यंत मुदत राहील. ( सन २०१९-२०२०) |
| ३२ | वेळोवेळी शासन निर्णयात झालेले बदल निविदा धारकास बंधनकारक राहील. |
| ३३ | वरील अटी व शर्ती मध्ये निविदा फॉर्मस विक्री व स्विकृतीचे कालावधीत फेरफार करण्याचा तसेच काही नवीन अटी व शर्ती समाविष्ट करण्याचा तसेच काही अटी शिथील करण्याच्या तसेच कोणतेही कारण न देता एकतर्फी निविदा नामंजूर करण्याचा व करारनामा संपुष्टात आणण्याचा अधिकार जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे राखीव ठेवण्यात आलेला आहे. तो निविदा धारकास बंधनकारक असेल तसेच निविदा रद्द करणे, पुढे ढकलने, तहकूब करणे हा अधिकार जिल्हाधिकारी ठाणे यांनी राखून ठेवला आहे. |

जिल्हाधिकारी ठाणे

**प्रपत्र**

**जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे**

ठाणे जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ग्रामीण भागात सन २०१९-२० या वर्षात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी खाजगी टँकर/ ट्रक पुरवठा करण्यांच्या कंत्राटाबाबतची ई- निविदा टँकर/ ट्रकव्दारे पाणी पुरवठा करण्यांसाठी ऑन- लाईन पध्दतीने भरावयाचे दरपत्रक

| प्रति मे. टन वाहन क्षमता | कमाल प्रतिदिन भाडे | कमाल प्रति किलोमीटर भाडे |
|---|---|---|
| १ मे. टन | | |

| टँकर / ट्रॅकवरील टाकींची पाणी वहन करण्याची क्षमता (दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये अतितीव्र घाट असलेल्या ठिकाणी | कमाल प्रतिदिन भाडे | कमाल प्रति किलोमीटर भाडे |
|---|---|---|
| ३००० ते ५००० लिटर्स | | |

**ई- निविदाकाराची सही संपुर्ण नांव व पत्ता**

**जिल्हाधिकारी ठाणे**